# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 11 May 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ११ मे २०२४ दुपारी १.०० वा.**

****

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्याचा प्रचार आज संपत आहे. या टप्प्यात राज्यातल्या औरंगाबाद, जालना, बीड, नंदुरबार, जळगाव, रावेर, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर आणि शिर्डी या मतदारसंघांमध्ये, परवा १३ मे रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी लागणारे साहित्य, साधन-सामुग्री मतदान केंद्रावर पुरवण्यात आली आहे. या अकरा मतदार एकूण २९८ उमेदवार निवडणूक लढवत असून, एकूण २३ हजार २८४ मतदान केंद्रांवर, ५३ हजार ९५९ बॅलेट युनीट, २३ हजार २८४ कंट्रोल युनीट आणि २३ हजार २८४ व्हीव्हीपॅट यंत्राच्या आधारे, दोन कोटी २८ लाख १ हजार १५१ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

****

औरंगाबाद लोकसभा मतदारसंघात निवडणूक यंत्रणा मतदानासाठी सज्ज झाली आहे. सर्व तयारी पूर्ण झाली असून, मतदान केंद्रांवर मतदारांसाठी विविध सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

****

मतदानासाठी बीड जिल्हा प्रशासनाची संपूर्ण तयारी झाली असून, नागरीकांनी मतदान करण्याचं आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी केलं आहे. बीड लोकसभा मतदारसंघात एकूण दोन हजार ३५५ मतदान केंद्र आहेत. यापैकी एका ठिकाणी किमान चार लोकांना एकाच वेळी मतदान करण्यात येणार आहे. मतदान केंद्रांवर पाण्याची व्यवस्था, लहान मुलांसाठी पाळणाघर असणार आहे. वैद्यकीय सुविधा पुरवण्यासाठी आशा वर्कर केंद्रात राहतील. एकूण ६३ मतदान केंद्राच्या ठिकाणी व्हिलचेअर ची व्यवस्था करण्यात आली असल्याचं जिल्हाधिकार्यांनी सांगितलं.

****

दरम्यान, आज शेवटच्या दिवशी सर्वच राजकीय पक्षाचे दिग्गज नेते जोरदार प्रचार करत आहेत.
काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी आज नंदुरबार इथं महाविकास आघाडीचे उमेदवार गोवाल पाडवी यांच्या प्रचारार्थ सभा घेतली.
केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी काल छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सिल्लोड इथं जालना लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार रावसाहेब दानवे यांच्या प्रचारासाठी सभेला संबोधित केलं. त्यापूर्वी त्यांनी बीड जिल्ह्यात माजलगाव इथं महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेला संबोधित केलं. यावेळी त्यांनी काँग्रेससह इतर विरोधी पक्षांवर कडाडून टीका केली.

****

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातलं मतदान होणार असलेल्या भागात उष्णतेची लाट नसल्याचा अंदाज, भारतीय हवामान खात्यानं वर्तवला आहे. या फेरीत उत्तर प्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, ओडिशा, झारखंड, आंध्र प्रदेश आणि जम्मू काश्मीर या नऊ राज्य आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या लोकसभेच्या एकूण ९६ जागांसाठी मतदान होणार आहे. पश्चिम राजस्थान वगळता भारताच्या कोणत्याही भागात उष्णतेची लाट नाही. तसंच पश्चिम राजस्थानमधली उष्णतेची लाट उद्यापासून कमी होणार असल्याचं भारतीय हवामान खात्याचे शास्त्रज्ञ आर के जेनामणी यांनी सांगितलं.

****

लातूर लोकसभा मतदारसंघात सात मे रोजी मतदान प्रक्रिया पूर्ण झाली. लातूर लोकसभा मतदारसंघ अंतर्गत सर्व मतदान केंद्रांवरील मतदान यंत्रे लातूर शहरातल्या बार्शी रोडवरील शासकीय महिला निवासी तंत्रनिकेतन इथल्या सुरक्षा कक्षात ठेवण्यात आली आहेत. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी काल या सुरक्षा व्यवस्थेची पाहणी करून आढावा घेतला.

****

नांदेड जिल्ह्यात काल अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर दोन बालविवाह रोखण्यास प्रशासनाला यश आलं. बालविवाह होणार असल्याची गोपनीय माहिती जिल्हा बाल संरक्षण कक्षास प्राप्त झाल्यानंतर संबंधित पथकाने हे विवाह थांबवून पालकांचं समूपदेशन केलं. जिल्ह्यात बालविवाह रोखण्यासाठी आणि बालविवाहाला आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिलेल्या वेळोवेळीच्या

सूचनेनुसार जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जनजागृतीचे प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित केले जात आहेत.

****

अमृतसर इथून सुटणाऱ्या अमृतसर – नांदेड सचखंड एक्सप्रेसची उद्या रविवारची फेरी रद्द करण्यात आली आहे. प्रवाशांना होणाऱ्या असुविधेबद्दल दिलगीर असल्याचं दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड जनसंपर्क कार्यालयानं कळवलं आहे.

****

भारताचा ऑलिम्पिकपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रानं दोहा डायमंड लीगमध्ये दुसरं स्थान पटकावलं आहे. नीरजनं सहाव्या प्रयत्नात ८८ पूर्णांक ३६ मीटर अंतरावर भाला फेकला. आशियाई क्रीडा स्पर्धेतील रौप्यपदक विजेता भारताच्या किशोर जेना यानंही यंदा डायमंड लीगमध्ये पदार्पण केलं. ७६ पूर्णांक ३१ मीटर भालाफेक करत तो  नवव्या स्थानावर राहिला.

****

भारताची कुस्तीपटू निशा दहियानं आगामी पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्रता मिळवली आहे. तुर्की मध्ये काल झालेल्या जागतिक ऑलिम्पिक पात्रता स्पर्धेत निशानं ६८ किलो वजनी गटात उपान्त्य फेरीत रोमानियाच्या खेळाडुचा पराभव केला. पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्रता मिळवणारी निशा ही पाचवी भारतीय महिला कुस्तीपटू आहे. याआधी अंतिम पंघाल, विनेश फोगाट, अंशु मलिक रितिका हुडा या देखील ऑलिम्पिकसाठी पात्र ठरल्या आहेत.

****